महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई.
दूरध्वनी क्र ०२२-२२०२३११६ Email ID : desk7a.agri-mh@gov.in

---

क्रमांक : मकृप-१०२२/प्र.क्र.२६४/७ अे. दिनांक: ०१/०६/२०२३.

प्रति,
महासंचालक,
महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,पुणे.

**विषय:-** महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे पुनर्विलोकन करण्यासाठी अभ्यासगट गठीत करणेबाबत...

**संदर्भ:** १) कृषि व पदुम विभाग,शासन निर्णय, क्रमांक:मकृप-१०२२/प्र.क्र.२६४/७-अे, दि.२५/०४/२०२३.
२) आपले पत्र जा.क्रमांक: मकृप/संशोधन-पुनर्विलोकन/प्र.क्र.६२३/१२१९/२०२३, दि.०३/०५/२०२३ रोजीचे पत्र.
३) कृषि व पदुम विभाग,शासन शुध्दीपत्रक, क्रमांक मकृप-१०२२/प्र.क्र.२६४/७-अे दि.०१/०६/२०२३.

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील दि.२५/०४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे पुर्नर्विलोकन करण्यासाठी अभ्यासगट गठीत करण्यात आला असून त्याकरीता डॉ.आर.बी.देशमुख,माजी कुलगुरु महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची रचना करण्यात आली आहे. सदर शासन निणर्यान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीने महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या कार्याचे पुनर्विलोकन करुन समितीचा अहवाल ४५ दिवसांत शासनास सादर करावा, असे निर्देशीत करण्यात आले आहे. तथापि, आपल्या उक्त संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये विनंती केल्यानुसार सदर समितीने केवळ कृषि परिषदेच्या कार्याचे पुनर्विलोकन न करता चारही कृषि विद्यापीठाच्या कार्याचे पुनर्विलोकन करणे आवश्यक असल्याने, समितीने चारही कृषि विद्यापीठे व कृषि परिषद यांच्या कामकाजाचे खालीलनमूद कार्यकक्षेत कामकाजाचे पुनर्विलोकन करुन आपला अहवाल सहा महिने (दि.३१/१०/२०२३ पर्यंत) शासनास सादर करावा, असे आपणांस कळविण्यात येत आहे. सदरची बाब समितीचे अध्यक्ष व समितीमधील सर्व सदस्यांना कृपया अवगत करावे, ही विनंती.

**चारही कृषि विद्यापीठे व कृषि परिषद यांच्या कामकाजाचे विषयासंदर्भात प्रस्तावित कार्यकक्षा-**

| अ.क्र. | विभाग/विषय | अभ्यासगट कार्यकक्षा |
|---|---|---|
| १ | प्रशासन | कृषि क्षेत्राच्या भविष्याचा वेध घेऊन कृषि शिक्षण व संशोधन परिषद आणि राज्यातील कृषि विद्यापीठे यांच्या संदर्भातील कायदेशीर तरतूदी व प्रचलित नियमावली यांचा आढावा घेऊन कालसुसंगत सुधारणा सुचविणे. |

| | | |
|---|---|---|
| २ | शिक्षण | राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी सुसंगत राज्य कृषि शिक्षण धोरणाचे प्रारूप व त्यानुषंगिक अंमलबजावणी कृती आराखडा तयार करणे. |
| ३ | संशोधन | कृषि विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या संशोधन केंद्रांचा संक्षिप्त आढावा घेऊन त्यांचे बळकटीकरण करणे तसेच राज्यात नव्याने लागवडीखाली आलेल्या व प्रस्थापित होत असलेल्या पिकावरील संशोधनासाठी उपाययोजना सुचविणे. |
| ४ | विस्तार शिक्षण | कृषि विद्यापीठांतर्गत चालू असलेल्या विस्तार शिक्षण कार्यक्रमांचा राज्याच्या कृषि विभागाच्या कृषि विस्तार योजनांशी पूर्वीच्या प्रशिक्षण व भेट योजनेप्रमाणे सांगड घालून आणि समन्वय व सहकार्य वाढवून अद्ययावत तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषि विस्तार यंत्रणा सक्षम व परिणामकारक करण्यासाठी उपाय सुचविणे. |
| ५ | वित्त | अ) कृषि विद्यापीठांना मिळणारी अनुदाने, त्यांची स्व-उत्पन्नाची साधने आणि अन्य आर्थिक स्त्रोतांचा आढावा घेऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.<br>ब) विद्यापीठांचे शासनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणे. |
| ६ | साधनसामुग्री विकास | कृषि विद्यापीठांकडे असलेल्या जमिनीसंदर्भात संरक्षण व व्यवस्थापन करीता उपाययोजना सुचविणे. |

आपला,

(उमेश चांदिवडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : १) मा.मंत्री (कृषि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.